**१०.७** उमेदवारांना प्रवेश हा जिल्हा बंदीची अट शिथील असल्यामुळे त्यांनी दिलेल्या विद्यालयांच्या पसंती क्रमांनुसार गुणानूक्रमे दिला जाईल. प्रवेश प्रक्रिया ही संबंधीत कृषि तंत्र विद्यालया मध्ये राबविण्यात येईल. विद्यापीठ परिक्षेत्रातील उमेदवार सर्व फे-यांसाठी गुणवत्तेनुसार पात्र असेल. वनामकृवि परिक्षेत्रा बाहेरील रहिवासी उमेदवार केवळ तृतिय फेरीसाठी रिक्त असलेल्या जागेस गुणवत्तेनुसार प्रवेशास पात्र राहिल.

**१०.८** सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडील जन्म दाखला यावरून **उमेदवाराचा रहिवाशी जिल्हा निश्चित केला जाईल.** विद्यार्थ्यांनी सक्षम अधिका-यांचे राहिवासी/अधिवास प्रमाणपत्र प्राधान्याने जोडणे आवश्यक आहे.

**१०.९** कृषि तंत्र विद्यालयाच्या सर्व साधरण गुणवत्तेनुसार, विद्यार्थ्यांनी दिलेल्या विद्यालयांचा प्राधान्यक्रम व आरक्षण विचारात घेवून तात्पुरत्या प्रवेश वाटप यादया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. प्रवेशनिवडी बाबत टपालाद्वारे सुचित करण्यात येणार नाही. प्रवेश कार्यक्रम व विद्यापीठ संकेतस्थळावरील सुचनांचे अनुपालन उमेदवाराने समय मर्यादेत च करणे आवश्यक आहे.

**१०.१०** प्रवेश वाटप यादी प्रसिध्द झाल्या नंतर ज्या विद्यार्थ्यास प्रवेशाचे वाटप झाले आहे त्या विद्यार्थ्यांनी **https://vnmkv.diplomaadmission.com** या संकेत स्थळावर स्वतःच्या Log in ID आणि Password देऊन तात्पुरते प्रवेश पत्र (Allotment letter) प्राप्त करुन घ्यावे.

**१०.११** उमेदवाराने प्राप्त केलेले तात्पुरते प्रवेश पत्र, विहित प्रवेश शुल्क, मुळ कागद पत्रे (छायांकीत प्रतीच्या २ संचासह) व स्वतःचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र इत्यादी सह संबधीत विद्यालयात पडताळणी करुन घ्यावी. उमेदवारांने प्रवेश घेते वेळी अर्जासोबत दिलेल्या सर्व प्रमाणित कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणल्या पाहिजेत. मुळ कागदापत्रा शिवाय प्रवेश दिला जाणार नाही व त्याबाबत कुठलीही सवलत अथवा विनंती विचारात घेतली जाणार नाही.

**१०.११.१.**संशयास्पद गुणपत्रिका एस.सी.सी. बोर्डाकडे तपासणी साठी पाठविल्या जातील व त्याबाबत बोर्डाकडून माहिती आल्यानंतर प्रवेश पूर्ण झाला असे समजण्यात येईल.

**१०.११.२.** एस.एस.सी. परिक्षेचे मुळ गुणपत्रकच (Mark Memo) प्रवेश देतेवेळी ग्राहय समजण्यात येईल. **एस.एस.सी.प्रमाणपत्रावरून प्रवेश दिला जाणार नाही.**

**१०.११.३.** टि.सी. ऐवजी बोनाफाईड प्रमाणपत्रावर प्रवेश घेतल्यानंतर मुळ टि.सी. व इतर सर्व आवश्यक ती कागदपत्रे विहित मुदतीतच सादर करणे बाबत हमी पत्र द्यावे लागेल.

**१०.११.४.** टिसी ऐवजी विद्यार्थ्यांने बोनाफाईड प्रमाणपत्रावर प्रवेश घेतला असल्यास त्याने सात दिवसात मुळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास संबधीत खाजगी कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांनी अशा

विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्य करून त्याची नावे संबधीत जिल्हयाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयाना सादर करावीत. अशा प्रकरणांची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्यांची राहील.

**१०.११.५.** विद्यार्थ्यांने प्रवेश घेतांना शाळा सोडल्याच्या दाखल्याची मुळ प्रत सादर करणे आवश्यक आहे. द्वितीय प्रतीवर प्रवेश दिला जाणार नाही. काही अपवादात्मक परिस्थितीत द्वितीय प्रत विचारात घेतली जाईल. तथापी त्या सोबत खालील कागदपत्रे देखील जोडणे आवश्यक आहे.

अ) रूपये ५००/- च्या बाँड पेपरवर शाळा सोडल्याचा मुळ दाखला हरवल्याचे महसूल कार्यालयाने तपासलेले शपथपत्र.

ब) संबधित मुख्याध्यापकाचे शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र हरवल्यामुळे विहीत बाबींची पूर्तता करून द्वितीय प्रत दिल्या बाबतचे पत्र.

क) मुळ दाखला हरवल्याबाबतची विभागीय वर्तमानपत्रातून प्रकाशीत केलेली जाहीर प्रगटनाची प्रत.

ड) शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र हरवल्याबाबत पोलीसात नोंदविलेली तक्रार व त्याबाबतचा तक्रार क्रमांक व अहवाल. या कागदपत्रा शिवाय द्वितीय प्रती वरील प्रवेश अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत व प्रवेश देखील ग्राहय समजण्यात येणार नाही.

इ) द्वितीय प्रतीवर मागास प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्ती मान्यते करिता संबंधीत समाजकल्याण विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१०.१२ कोणत्याही उमेदवाराची प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरी साठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, Log in मध्ये डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड /नेट बँकींगद्वारे रु. १००/- ऑनलाईन अदा करुन प्रवेश नाकारावा.

**१०.१३** एखाद्या विद्यार्थ्याने रु.१००/- फी भरुन त्याचा/तिचा प्रवेश नाकारला नाही किंवा प्रवेश वाटपानुसार प्रवेशही घेतला नाही तर त्याचा/तिचा तृतिय प्रवेश फेरी खेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.

**१०.१४** प्रवेशित विद्यार्थी पुढील प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेशास पात्र असणार नाही. मात्र प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास/प्रवेश वाटप नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द/नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्दकरता येतील.

**१०.१५** घटक कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी संपल्यानंतर व तिसरी प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी आपआपल्या जिल्हयातील खाजगी कृषि तंत्र विद्यालयात प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे तपासून घ्यावीत.

**१०.१६** जिल्हयातील सर्व रिक्त जागांचा तपशील प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर. कृषि तंत्र विद्यालय यांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रवेशाच्या संबंधित कागदपत्रासह सादरकरतील. कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यानी सर्व रिक्त जागांचा तपशील संकेतस्थळावर अद्ययावत करावा.

**१०.१७** पहिल्या फेरी नंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी दुसरी व तीसरी फेरी राबविण्यात येईल. उमेदवार उपलब्ध नसल्यास प्रवर्ग बदलून शासकीय नियमानुसार वाढीव फेरी राबविण्याचा निर्णय विद्यापीठस्तरावर घेण्यात येईल.

**१०.१८** तृतिय प्रवेश फेरी ही केवळ ज्या त्या जिल्हयाच्या घटक कृषि तंत्र विद्यालय स्तरावर ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येईल. या फेरीत वसंतराव नाईक मराठवाडा कषि विद्यापीठाच्या परिक्षेत्राबाहेरील इतर जिल्हयातील रहिवासी पात्र उमेदवारांना, **https://vnmkv.diplomaadmission.com** द्वारे प्राप्त

झालेल्या यादी नुसार उपस्थिता मधून रिक्त जागांसाठी गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल. सदरील प्रवेश फेरीची कार्यपध्दती परिशिष्ट-ड मध्ये देण्यात आलेली आहे.

**१०.०९** एखाद्या उमेदवाराला प्रवेश वाटपा बाबत तक्रार करायची असल्यास, संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच विद्यापीठातील कुलसचिव/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल. अशा तक्रारी बाबत तात्काळ शहानिशा करून यथा योग्य कार्यवाही करण्यास कुलसचिव / सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) हे सक्षम असतील.

## ११. प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा :

- प्रवेशाची नोंदणी केल्या नंतर व वर्ग सुरु होण्यापुर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्याकडून प्रवेश प्रक्रिया शुल्का पोटी रु.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.
- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास प्रवेश शुल्कापोटी रू.१०००/- अधिकवर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष/ सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.
- वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन प्रवेश रद्द केल्यास, नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्दकेला असेल त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष/सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

## १२. विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त :

विद्यार्थी रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास पूर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच रॅगिगंच्या नियमानुसार त्यांचे वर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी helpline@antiragging.in संकेतस्थळावर भेट देऊन रॅगिंग बाबतची संपूर्ण माहिती स्वतः अवगत करुन घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यावर रॅगिंग बाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीने www.antiragging.in किंवा www.amanmovement.org या संकेतस्थळावर भरुन घेणे सक्तीचे आहे.

## १३. शिष्यवृत्ती आणि सवलती-

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम हा व्यावसायिक म्हणून घोषित झालेला नाही. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती (शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती व शिष्यवृत्ती) सदर अभ्यासक्रमांना अनुज्ञेय नाहीत. शासन मान्य भारत सरकार शिष्यवृत्ती लागु असल्यास तिचा लाभ विद्यार्थ्यास मिळू शकेल. परंतू विहीत कालावधीत भारत सरकार शिष्यवृती आवेदनपत्र संबधीत विभागाच्या संकेतस्थळावर भरणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील. तसेच भारत सरकार शिष्यवृती योजना कोणत्याही कारणास्तव नामंजुर झाल्यास संबधीत विद्यार्थ्यांस विहीत शुल्क भरणे अनिवार्य आहे.

## १४. आरक्षित जागा :

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील तरतूदीनुसार या विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षीत ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व नवबौध्द | १३ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| ३ | विमुक्त जमाती (अ) (१४ व तत्सम जाती) (डी-टी-अे) | ०३ टक्के |
| ४ | भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.ब) | २.५ टक्के |
| ५ | भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) (एन.टी.क) | ३.५ टक्के |
| ६ | भटक्या जमाती (ड) (वंजारी व तत्सम जमाती) (एन.टी.ड) | ०२ टक्के |
| ७ | इतर मागास वर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) | १० टक्के |
| ९ | सामाजीक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गीय (एसईबीसी) | १० टक्के |
| | **एकूण** | **७० टक्के** |
| १० | शेतकरी व याबाबत परिनियमाने विहीत करण्यात येतील अशा किमान किंवा कृषि विषयक अनुभव असलेली शेतकऱ्यांची मुले/ मुली (अे.जी.) | ०६ टक्के |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले/ मुली/ नातू (मुलाचा मुलगा) (एफ.एफ.) | ०२ टक्के |
| १२ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापित पुर्नवसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापित व्यक्ति आणि त्यांची मुले / मुली (पी.ए.पी.) | ०४ टक्के |
| १३ | आजी व माजी सैनिकांची मुले / मुली (डी.पी.) | ०२ टक्के |
| १४ | दिव्यांग उमेदवारा करीता (४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व) (अल्पदृष्टी, कार्णबधीर, अस्थिव्यंग, मेंदूच्या पक्षघात यापैकी योग्य उमेदवार निवडण्याचे अधिकार प्रवेश समितीस असतील) जिल्हा शल्यचिकीत्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक (पी.एच.) | ०५ टक्के |
| १५ | महिला | ३० टक्के |
| १६ | अनाथ | ०१ टक्के |

उपरोक्त आरक्षित जागांचा अनुशेष वेळोवेळी शासनाकडून देण्यात येणाऱ्या शासन नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

**टिपः-**

(१) अ.क्र.१० ते १६ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच अ.क्र. १६ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्ते नुसार समाविष्ठ राहील.

(२) पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये संदर्भात शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७-अे दिनांक २०-१०-२०११ मध्ये नमुद करण्यात आलेल्या

जागांच्या रुपांतराच्या कार्यपध्दतीच्याधर्ती वर कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रुपांतर करण्यात येईल.

(३) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. (नॉन-क्रिमिलेअर दाखला आवश्यक).

(४) रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश क्षमतेच्या कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात येतील, जसे अ.जा/ अ.ज./ वि.जा./ भ.ज. आणि इतर मागासवर्गीय तथापि या पध्दतीने आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

(५) शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५-६-२००६ अन्वये विमुक्त जाती अ.ब. भटक्या जमाती क.ड. त्याच बरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास वर्ग व आर्थीक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी क्रिमीलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

(६) इतर आरक्षणांतर्गत अ.क्र.१४ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारी नुसार वाटानिश्चित पणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक.१६-३-१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

(७) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांच्या मुलास प्रवेश देतांना खालील अटीचे पालन काटेकोर पणे करण्यात यावे.

(१) ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे तो स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाचा मुलगा / मुलगी आहे या विषयी प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

(२) सदरील प्रतिज्ञा पत्रात असे विहीत करण्यात यावेकी,

(अ) नामनिर्देशित करण्याची सवलतयापूर्वी मी कोणत्याही नातेवाईकासाठी वापरली नाही.

(ब) सदरील स्वातंत्र्य सैनिकाच्या नातेवाईकाला प्रवेश सवलती मिळाल्यास यापुढे मी कोणत्याही सवलतीसाठी इतर नातेवाईकांसाठी नामनिर्देशीत करण्याची सवलत वापरणार नाही.

(८) महाराष्ट्रातील विविध प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या व्यक्तीचें पुनर्वसन अधिनियम १९७६ यामध्ये उल्लेख केल्या प्रमाणे विस्थापीत व्यक्ती व त्यांची मुले/मुली (या जागा भरतांना समसमान गुण असल्यास कृषि विद्यापीठामुळे विस्थापीत झालेल्या व्यक्ती व त्यांची मुले यांना प्राधान्य देण्यात येईल)

## १५. गुणाधिभार

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| अ | तलाठी / पटवारी / डाटाबेस / ई-महासेवा यांनी सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ मध्येदिलेला शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा/ खासरा (गांव नमुना) उमेदवाराच्या नावावर किंवा त्यांचे आई / वडील किंवा त्याचे आजी / आजोबा यांच्या नावे, यदाकदाचित आई / वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र किंवा भुमीहीन शेतमजुर प्रमाणपत्र (हे प्रमाणपत्र प्रवेश घेणा-या उमेदवाराचे नांवे नसावे) | १२ टक्के |
| ब | एन.सी.सी / एम.सी.सी / स्काउट / गाईड प्रमाणपत्र असल्यास (तालुका / जिल्हा समादेशक / मुख्याध्यापक यांचे प्रामणपत्र ग्राहय धरले जाईल) (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे) | २ टक्के |
| क | क्रीडा/ सांस्कृतिक नैपुण्य/ वादविवाद/ नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका/ जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे) | २ टक्के |
| ड | राज्यातील कृषि विद्यापीठाच्या आजी/ माजी कर्मचाऱ्यांचा मुलगा/ मुलगी असल्यास संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव, यांचे प्रमाणपत्र. | ३ टक्के |
| | **एकूण अधिभार** | **१९ टक्के** |

## १६. पदविका अभ्यासक्रमांचे शुल्कः

निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेश घेतेवेळी संबंधित शासकीय / अनुदानित अथवा विना अनुदानित विद्यालयांमध्ये शुल्क भरावे लागेल. अभ्यासक्रमा करिता निर्धारित केलेल्या शुल्काचा तपशील खालील प्रमाणे असून ते कृषि परीषदेच्या संमतीने बदलाधीन आहे.

### १६.१ कृषि तंत्र पदविका (२ वर्षे - मराठी माध्यम)

| अ. क्र. | सर्वसाधारण शुल्क | विद्यापीठ/अनुदानित | | विना अनुदानित | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) |
| (अ) शुल्क | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | २०००० | २०००० | ३०००० | ३०००० |
| २ | प्रवेश शुल्क | १००० | १००० | १००० | १००० |
| ३ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ४ | वाचनालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| **५** | **परीक्षा शुल्क** | **१२००** | **१२००** | **१२००** | **१२००** |
| ६ | अनामत शुल्क* | १०० | -- | १०० | -- |
| ७ | सत्र शुल्क (रु.) | १०० | २०० | १०० | २०० |
| ८ | ओळखपत्र शुल्क | १०० | -- | १०० | -- |
| ९ | वैद्यकीय शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| १० | विद्यार्थी विमा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ११ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| | **एकूण (अ)** | **२३,४००** | **२३,३००** | **३३,४००** | **३३,३००** |
| **(ब) वसतीगृहात राहु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी फक्त** | | | | | |
| १ | वसतीगृह शुल्क | १००० | १००० | १००० | १००० |
| २ | भांडी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | खानावळ (खानावळ ठेव) | १००० | -- | १००० | -- |
| ४ | विद्युत बील आकार | १००० | १००० | १००० | १००० |
| ५ | **एकूण (ब)** | **३१००** | **२१००** | **३१००** | **२१००** |
| | **एकूण (अ+ब)** | **२६,५००** | **२५,४००** | **३६,५००** | **३५,४००** |
| | ***सेवाउपलब्ध असल्यास** विद्यार्थ्यांना परतकरावयाची रक्कम** | | | | |

*वसतीगृह शुल्क, भांडी शुल्क, मेसठेव, विद्युत आकार हे प्रवेशाचे वेळी घेण्यात येऊ नये, प्रवेशनियमित झाल्यानंतर उपवरोक्त सेवा उपलब्ध असल्यास याबाबतचे शुल्क आकारण्यात यावे, सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारू नये.

*अनामत रक्कम, मेस ठेव इ. रक्कम शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.

*विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबधित विषयाकरिता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्कन आकारता संबधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.

*पदविका अभ्यासक्रम अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केल्या नंतर विद्यार्थ्या सत्याचा व्यक्तिगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्याने भरलेली अनामत (Caution Money) रक्कम विद्यार्थ्यांना अंतिमगुण पत्रक देते वेळी परत केली जाईल.

## १५. ऑनलाईन प्रवेश कार्यक्रम २०२६-२७ :

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | **२०.०५.२०२६** |
| २ | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्या सोबतची आवश्यकती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळा वर अपलोड करावायाचा अंतिम दिनांक | **१०.०६.२०२६** |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१५.०६.२०२६** |
| ४ | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | **१९.०६.२०२६** |
| ५ | हरकत निवारण समितीची बैठक | **२०.०६.२०२६** |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **२४.०६.२०२६** |
| ७ | प्रथम (पहिली) प्रवेश फेरीच्या विद्यालयनिहाय यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **२९.०६.२०२६** |
| ८ | संबधीत विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **०६.०७.२०२६ (सायंकाळी ५.३० पर्यंत)** |
| ९ | दुसऱ्या (द्वितीय) प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी | **०९.०७.२०२६** |
| १० | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **१५.०७.२०२६(सायंकाळी ५.३० पर्यंत)** |
| ११ | तिसरी(**तृतिय**) प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रुपांतरासह) | **२०.०७.२०२६** |
| १२ | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **२४.०७.२०२६ (सायंकाळी ५.३० पर्यंत)** |
| १३ | विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादी नुसार घटक विद्यालय स्तरावर / विद्यापीठस्तरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशीलाची संकेतस्थळा वर प्रसिध्दी दिनांक | **२८.०७.२०२६ (सायंकाळी ५.३० पर्यंत)** |
| १४ | रिक्त जागा करीता "प्रवेश प्रक्रिया घटक कृषि तंत्र विद्यालयास्तर ऑनलाईन चौथी (चतृर्थ) प्रवेश फेरी" (परिशिष्ट-ड मधील कार्यपध्दती नुसार) प्रवेश फेरीचा कालावधीत | **३०.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६** |
| १५ | वर्ग सुरू होण्याचा दिनांक | **०३.०८.२०२६** |

***सुट्टीचे दिवस वगळुन***

## १८. प्रवेशाकरितातपासवयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र | प्रमाणपत्र /कागदपत्रांचा तपशील | आहे ✔ / नाहीx |
|---|---|---|
| १ | सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडील जन्म दाखला / जिल्हा निश्चितीकरिता रहिवाशी प्रमाणपत्र | |
| २ | इयत्ता १० वी (माध्यमिक शालान्त) गुणपत्रक | |
| ३ | ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate). | |
| ४ | शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) | |
| ५ | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्यानेदिलेले 'जात प्रमाणपत्र' | |
| ६ | तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी या पेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिकाऱ्यांनी दिनांक **०१.०४.२०२६** रोजी किंवा त्या नंतर दिलेले किंवा ज्या दिनांकास प्रवेश अर्ज दिला असेल, त्यादिनांकास ग्राहय असलेले उन्नत व प्रगत गटात मोडतनसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र | |
| ७ | उम्मेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा 'स्वातंत्र्य सैनिक' असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मा. मुख्यमंत्री यांची सही असलेले प्रमाणपत्र.<br>स्वातंत्र्यसैनिक यांचे खालील प्रमाणे रुपये १००/- चेस्टॅम्पपेपर वरील प्रतिज्ञापत्र.<br>● उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.<br>● स्वातंत्र्य सैनिकाने हया सवलतीचा उपयोगया पूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.<br>● स्वातंत्र्य सैनिकाने हया सवलतीचा जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही. | |
| ८ | उमेदवाराचे वडील अथवा उमेदवार स्वतः सैनिक असल्यास संबंधित सैन्याधिकारी / जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा DischargeCertificate ची प्रत . | |
| ९ | दिव्यांग प्रवर्गासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. | |
| १० | महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी उमेदवार/वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना द्यायचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | |
| ११ | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारा पेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्या कडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्या मध्ये सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| १२ | (i) उमेदवाराच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन२०२४-२५ किंवा २०२५-२६** वर्षाचा गाव ७/१२ | |

| | | |
|---|---|---|
| | उतारा.<br>(ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावरील ७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>(iii) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तिचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले शपथपत्र. | |
| १३ | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी'(एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** | |
| १४ | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्कॉऊट गाईड तालुका समादेशक / मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी.) जिल्हा समादेशक अधिकारी / मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र. | |
| १५ | तालुका किंवा जिल्हा पातळी वरील तालुका/जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याने निर्गमित केलेले इयत्ता १० वी पर्यंतचे प्रमाणपत्र नोंदणी कृत क्रीडा असोशिएशनने प्राधिकृत केलेल्या क्रीडा स्पर्धेचे तालुका / जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रति स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र. | |
| १६ | राज्यातील उमेदवाराचे पालक कृषि विद्यापीठे/कृषि परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. | |
| १७ | सांस्कृतिक नैपुण्य/वादविवाद/नाटक इत्यादी स्पर्धे मध्ये भाग घेतला असल्यास तालुका/जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यतचे ) प्रमाणपत्र. | |
| १८ | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र.<br>(No Objection Certificate) | |
| १९ | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २/४/२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र. | |
| २० | कागदपत्रांच्या प्रती विषयी स्वंय घोषना पत्र (परिशिष्ट-क) | |

## परिशिष्ट‘अ’

**भूमिहीन शेतमजूर असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ........................................... (विद्यार्थ्याच्या वडीलांचे /आईचेनांव) राहणार.......................... तालुका............................ जि. .............................. हे ...................................................... (विद्यार्थ्यांचे नाव) यांचे वडील/आई असून त्यांच्या नांवे कोणतीही शेतजमीन नाही. त्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन हे .......................................... (शेत मालकाचे नांव) राहणार.................... तालुका..................... जि. .................. यांच्या शेतामधील दैनंदिन मजुरी हेच आहे.

ठिकाण - स्वाक्षरी

दिनांक - नाव व पदनाम

कार्यालयीन मोहर

.........................................................................................................................................

टीप- हे प्रमाणपत्र प्रवेशघेणा-या विद्यार्थ्याच्या नावे नसावे.

## परिशिष्ट‘ब’

### शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती.................................................................. (जमीन धारकाचे नांव) राहणार....................तालुका.................... जि. ............................. हे श्री./कु. .......................................................... (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती............................................... यांच्या नांवे ........... हे ............आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन ........................................ अधिनियम* १९........... चे कलम ............ मधील तरतुदी नुसार कमाल धारणे पेक्षा अधिक नाही. असे ही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पन्नांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण - स्वाक्षरी

दिनांक - नांव व पदनाम

कार्यालयीन मोहर

.........................................................................................................................................

**टीप** (१)* येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.

(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.

(३) ‘शेतकरी’ म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणे पेक्षा अधिक नाही.

(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

**परिशिष्ट'क'**

**'मूळ प्रती विषयी स्वयं घोषणापत्र'**

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

मी ............................................... श्री...................................... यांचा मुलगा / मुलगी वय ............ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............................. व्यवसाय ....... राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेत स्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-............... अर्जदाराची सही

दिनांक :-............... अर्जदाराचे नावः......................

## परिशिष्ट‘ड’

## घटक कृषि तंत्र विद्यालयस्तरावरील ऑनलाईन चौथी प्रवेश फेरी कार्यपध्दती

चौथी **(चतुर्थ)** प्रवेश फेरी पूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश न मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी **दि.३०.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६** या कालावधीत ज्या त्या जिल्हयाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयात खालील कार्यपध्दतीने **प्रवेश प्रक्रियेची घटक कृषि तंत्र विद्यालयस्तरावरील ऑनलाईन** चौथी **(चतुर्थ) प्रवेश फेरी** राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्ग निहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्ग निहाय तपशील संकेतस्थळावर दि. **२८.०७.२०२६** रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालु शैक्षणिक वर्षाच्या पदविका प्रवेश प्रक्रिये द्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार** चौथी **(चतुर्थ) प्रवेश फेरी करिता पात्र असतील. तसेच वनामकृवि कार्यक्षेत्रा बाहेरील जिल्हयातील राहिवाशी असलेले विद्यार्थी देखील या फेरीसाठी पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच चौथी **(चतुर्थ)** प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व घटक कृषि तंत्र विद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) घटक कृषि तंत्र **विद्यालयस्तरावरील ऑनलाईन** चौथी **(चतुर्थ) प्रवेश फेरीची प्रवेश प्रक्रिया ज्या त्या जिल्हयाच्या घटक विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रात** राबविण्यात येईल.

(२) संकेतस्थळा वरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या विद्यालयात **दि. ३०.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६** या कालावधीत सकाळी ९.०० ते १२.०० वाजेपर्यंत आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी स्वतः उपस्थित राहून नांव नोंदणी करावी.

(३) प्रवेश प्रक्रिया केंद्राच्या प्रमुखांनी उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरील प्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.मकृवि'२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दती नुसार अशा रिक्त जागांवर घटक कृषि तंत्र विद्यालयस्तरावरील ऑनलाईन चौथी (चतुर्थ) प्रवेश फेरी तील शेवटच्या दोन दिवशी म्हणजेच दि. **३०.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६** रोजी उपस्थित असलेल्या इतर

उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही. अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारां कडुन कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित घटक कृषि तंत्र विद्यालय प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी घ्यावी.

(५) दिनांक **०१.०८.२०२६** प्रवेश फेरीतील प्रवेश प्रक्रिया संपताच रिक्त जागांचा तपशिल त्वरीत घटक कृषि तंत्र विद्यालयानी कुलसचिव अथवा सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) यांना सादर करावा

(६)दिनांक **३०.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६** या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित घटक कृषी तंत्र विद्यालय प्रवेश प्रक्रिया केंद्रांवर राबविण्यात यावी.

(७) या प्रवेश फेरी द्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित घटक कृषि तंत्र विद्यालय प्रवेश प्रक्रिया केंद्रांकडून तात्पुरते ‘प्रवेश वाटप पत्र’ देण्यात येईल.

(८) संबधीत कृषि तंत्र विद्यालयांनी प्रवेशीत विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम वर्षाची शुल्काची रक्कम प्राप्त करून उमेदवारास पावती द्यावी.

(९) या प्रवेश फेरीच्या कालावधी मध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, या मुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (या प्रवेश फेरीच्या शेवटच्यादिवशी रिक्त होणा-या जागां संदर्भात ही बाब लागू नसेल.)

।। ****।।